॥ सा विद्या या विमुक्तये ॥

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपुरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)

SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED

"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)

Established on 17th September 1994 – Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade

25 1994 - 2019 SILVER JUBILEE YEAR

ACADEMIC (1-BOARD OF STUDIES) SECTION

Phone: (02462) 229542
Fax : (02462) 229574

Website: www.srtmun.ac.in

E-mail: bos.srtmun@gmail.com

शैक्षणिक वर्ष २०१९–२० करिता औषधनिर्माणशास्त्रे (CGPA Pattern) तृतीय वर्षातील अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना शैक्षणिक सत्र पूर्ण करण्यासाठी अंतिम वर्षात तात्पुरता प्रवेश देण्याबाबत.

# प रि प त्र क

या परिपत्रकान्वये औषधनिर्माणशास्त्रे संकुलातील संचालक व औषधनिर्माणशास्त्रे महाविद्यालयांच्या प्राचार्यांना कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१९–२० करिता औषधनिर्माणशास्त्रे (CGPA Pattern) तृतीय वर्षातील अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना शैक्षणिक सत्र पूर्ण करण्यासाठी अंतिम वर्षात तात्पुरता प्रवेश देण्याचा निर्णय झालेला आहे. त्याची नियमावली खालीलप्रमाणे आहे.

१) औषधनिर्माणशास्त्रे तृतीय वर्षातील अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना नवीन अभ्यासक्रमातील बदलामुळे अंतिम वर्षात केवळ शैक्षणिक सत्र पूर्ण करण्यासाठी तात्पुरता प्रवेश देण्यात यावा.

२) सदरील अंतिम वर्षात दिलेला प्रवेश हा तात्पुरत्या स्वरूपात असेल. हिवाळी २०१९ मध्ये होऊ घातलेल्या परीक्षेमध्ये द्वितीय वर्ष पूर्णत: उत्तीर्ण असल्याशिवाय व तृतीय वर्षात किमान ए.टी.के.टी. असल्याशिवाय सदर विद्यार्थ्यास अंतिम वर्षास दिलेला तात्पुरता प्रवेश नियमित होणार नाही.

३) समाजकल्याण विभागाकडून मिळणाऱ्या शिष्यवृत्ती संदर्भात विद्यापीठाची जबाबदारी राहणार नाही. ती सर्व जबाबदारी संबंधित विद्यार्थ्यांची असेल, असे हमीपत्र संबंधित विद्यार्थी व त्यांच्या पालकांकडून घेण्यात यावे.

सदरील परिपत्रक प्रस्तुत विद्यापीठाच्या **www.srtmun.ac.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तरी सदरील बाब ही सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावी.

'ज्ञानतीर्थ' परिसर,
विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६.
**जा.क्र.:** शैक्षणिक–१/परिपत्रक/औषधनिर्माणशास्त्रे/तात्पुरता प्रवेश/२०१९–२०/९३९
**दिनांक** : १३.०८.२०१९.

स्वाक्षरित/–
**उपकुलसचिव**
शैक्षणिक (१–अभ्यासमंडळ) विभाग

प्रत माहिती व पुढील कार्यवाहीस्तव :

१) मा. कुलसचिव यांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
२) मा. संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
३) मा. संचालक, औषधनिर्माणशास्त्रे संकुल, प्रस्तुत विद्यापीठ.
४) मा. प्राचार्य, सर्व संबंधित संलग्नित औषधनिर्माणशास्त्रे महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ.
५) साहाय्यक कुलसचिव, पदव्युत्तर विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.
६) उपकुलसचिव, पात्रता विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.
७) सिस्टम एक्सपर्ट, शैक्षणिक विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.